# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः15.05.2025** **वारःगुरुवार**

---

1. भारत सेमीकंडक्टर अभियानाअंतर्गत जेवर इथं सहावं केंद्र
2. छत्तीसगढमध्ये 16 महिला सदस्यांसह एकंदर 31 नक्षलींना ठार करण्यात सुरक्षा दलाला यश
3. संरक्षणमंत्री राजनाथ सिंग आज जम्मू आणि काश्मिरच्या दौऱ्यावर
4. रशिया आणि युक्रेनदरम्यान आज तुर्क्रिएमध्ये शांततेसाठी बैठक आणि
5. सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेची आज सांगता, महाराष्ट्राचं अव्वल स्थान कायम

**सेमीकंडक्टर**

भारत सेमीकंडक्टर अभियानाअंतर्गत उत्तर प्रदेशामधील जेवर इथं सेमिकंडक्टर उत्पादनासाठीचं सहावं केंद्र स्थापित करण्याचा निर्णय काल केंद्र सरकारनं घेतला. माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत पत्रकारांना ही माहिती दिली. सेमीकंडक्टर अभियानाअंतर्गत HCL आणि Foxconn या कंपन्या संयुक्तपणे हा प्रकल्प राबवणार असून याद्वारे प्रतिमहिना 20 हजार वेफरची निर्मिती होईल. तर 36 दशलक्ष डिझाईन आऊटपूट एवढी त्याची क्षमता असेल असंही वैष्णव यावेळी बोलताना सांगितलं.

पाच सेमीकंडक्टर युनिट्सच्या कामाला यापुर्वीच सुरुवात झाली असून या प्रकल्पाच्या बांधकाम पुढच्या टप्प्यात आहेत आणि या सहाव्या युनिटसह, भारत धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेल्या सेमीकंडक्टर उद्योगाच्या विकासाच्या प्रवासात पुढे जात आहे. 270 शैक्षणिक संस्था आणि 70 स्टार्टअपमधील विद्यार्थी आणि उद्योजक नवीन उत्पादने विकसित करण्यासाठी जागतिक दर्जाच्या नवीनतम डिझाइन तंत्रज्ञानावर काम करत आहेत. असंही वैष्णव यांनी सांगितलं. उत्तर प्रदेशात सेमीकंडक्टर युनिट स्थापन करण्याबाबतच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयामुळे विकास आणि नवीन उपक्रमाला चालना मिळेल. अशी भावना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली.

**राष्ट्रपती**

दहशतवादाचा बिमोड करण्यात सैन्यदलांनी दाखवलेल्या शौर्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी कौतुक केलं आहे. तिन्ही संरक्षण दलांचे मुख्य अधिकारी सरसेनाध्याक्ष जनरल अनिल चौहान, लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, हवाईदल प्रमुख एअरचीफ मार्शल ए. पी. सिंग आणि नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन त्यांना ऑपरेशन सिंदूरबाबत माहिती दिली. त्यावेळी राष्ट्रपतींनी आपल्या संरक्षण दलाच्या समर्पण आणि शौर्याचं कौतुक केलं.

**नक्षलवादी**

नक्षलवाद्यांच्या समूळ उच्चाटनासाठी सुरक्षा दलाची कारवाई योग्य दिशेने सुरु असल्याचे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. छत्तीसगडमध्ये नक्षलीविरोधी कारवाईअंतर्गत 16 महिला सदस्यांसह एकंदर 31 नक्षलींना ठार करण्यात सुरक्षा दलाला यश आलं. या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी समाजमाध्यमावरील संदेशात सुरक्षा यंत्रणेचं कौतुक केलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिलेला सोशल मीडिया संदेश उद्धृत करताना मोदी म्हणाले की, नक्षलग्रस्त भागात शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि

त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात जोडण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे. छत्तीसगढमधील बिजापूर जिल्ह्यातील तेलंगण सीमेवर असलेल्या कर्रेगुट्टा टेकडीवर एकंदर 21 दिवस ही कारवाई सुरु होती. अशी माहिती काल विजापूरमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत केंद्रीय राखीव पोलीस दल अर्थात सीआरपीएफचे महासंचालक ज्ञानेंद्र प्रताप सिंह, छत्तीसगडचे पोलीस महासंचालक अरुण देव गौतम आणि विजापूरचे पोलीस अधीक्षक जितेंद्र कुमार यादव यांनी दिली.

**तिरंगा यात्रा ऑपरेशन सिंदूर**

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याचा सन्मान, आणि वीर जवानांना मानवंदना देण्यासाठी भारतीय जनता पक्षानं देशभर तिरंगा यात्रेचं आयोजन केलं आहे. येत्या 23 मे पर्यंत तिरंगा यात्रा देशभर सुरू राहणार आहे. ऑपरेशन सिंदूर आणि त्यानंतरच्या लष्करी कारवाईमुळे पाकिस्तानसह जगाला भारतीय संरक्षण दलाची अभेद्य ताकद कळली, असे गौरवोद्गार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत काल मुंबईत तिरंगा यात्रा काढण्यात आली.

**सरन्यायाधीश परिचय**

भारताचे 52 वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांनी काल शपथ घेतली. राष्ट्रपती भवनात झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, लोकसभेचे सभापती ओम बिरला, पंतप्रधान नरेंद्र मोदी, सर्वोच्च न्यायालयातले इतर न्यायाधीश या समारंभाला उपस्थित होते. निवृत्त मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना यांचा कार्यकाळ 13 मे रोजी संपल्यानंतर न्यायमूर्ति गवई यांनी हा पदभार स्विकारला आहे. राजकारणी, आंबेडकरवादी नेते, माजी खासदार आणि विविध राज्यांचे राज्यपाल राहिलेले रा.सु. गवई यांचे ते सुपुत्र आहेत. 24 मे 2019 रोजी त्यांना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून पदोन्नती मिळाली. सर्वोच्च न्यायालयात असताना, न्यायमूर्ति गवई यांनी अनेक ऐतिहासिक खटल्यांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

**जम्मू-काश्मिर**

संरक्षणमंत्री राजनाथ सिंग आज जम्मू आणि काश्मिरच्या दौऱ्यावर जाणार असून या भागातील सुरक्षा स्थितीचा आढावा घेणार आहेत. दरम्यान, जम्मू आणि काश्मिरमध्ये अवंतीपुरा भागातील त्रालनजिक सुरक्षा दल आणि दहशतवादी यांच्यादरम्यान आज सकाळपासून चकमक सुरु आहे. जम्मू आणि काश्मिर पोलीस दल आणि इतर सुरक्षा यंत्रणा या हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देत असल्याची माहिती पोलीसांच्या प्रवक्त्यानं समाजमाध्यमावर दिली.

**पुतीन**

युक्रेन आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष तुर्कीएतील इस्तंबूल इथं थेट चर्चा करण्याचं नियोजन आहे. मात्र राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन शांतता चर्चेला उपस्थित राहणार नाहीत असं रशियाने जाहीर केलं आहे. त्याऐवजी, राष्ट्रपतींचे सहाय्यक व्लादिमीर मेडिन्स्की रशियन शिष्टमंडळाचे नेतृत्व करतील. शिष्टमंडळातील इतर सदस्यांमध्ये उप परराष्ट्र मंत्री मिखाईल गालुझिन, जनरल स्टाफ डायरेक्टर इगोर कोस्ट्युकोव्ह आणि उप संरक्षण मंत्री अलेक्झांडर फोमिन यांचा समावेश आहे. असं क्रेमलिननं जारी केलेल्या निवेदनांत म्हटलं आहे. तीन वर्षांनंतर दोनही देश थेट समोरासमोरच्या चर्चेसाठी येणार आहेत.

**भारतीय तांत्रिक पथक**

भारतीय तांत्रिक पथक न्यूयॉर्कमध्ये 1267 सँक्शन्स समितीच्या देखरेख पथकाशी आणि संयुक्त राष्ट्रांमधील इतर भागीदार देशांशी संवाद साधण्यासाठी दाखल झालं आहे. ते संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवाद विरोधी कार्यालय आणि दहशतवाद विरोधी समितीच्या कार्यकारी संचालनालयालाही भेट देतील. अशी माहिती आकाशवाणीच्या सुत्रांनी दिली. 1267 सँक्शन कमिटी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची एक समिती असून ती इस्लामिक स्टेट आणि अल-कायदा विरुद्ध आंतरराष्ट्रीय निर्बंध लागू करण्याचे काम करते.

**अमेरिका-कतार**

अमेरिका आणि कतारदरम्यान एकंदर एक ट्रिलिअनपेक्षा अधिक किंमतीचे ऐतिहासिक आर्थिक करार काल करण्यात आले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप सध्या कतारच्या दौऱ्यावर आहेत. या भेटीदरम्यान, ट्रम्प यांनी अमेरिका आणि कतार यांच्यात एकंदर 243 अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त किमतीच्या आर्थिक करारांची घोषणा केली, यामध्ये कतार एअरवेजला बोईंग विमाने आणि जीई एरोस्पेस इंजिन विक्री करण्यासंदर्भातील कराराचा समावेश आहे. तत्पूर्वी, ट्रम्प सौदीची राजधानी रियाध इथं झालेल्या अमेरिका आणि गल्फ सहकार्य परिषद सदस्यांच्या शिखर बैठकीला उपस्थित होते. तसंच सीरियाचे अंतरिम अध्यक्ष अहमद अल-शारा यांचीही भेट घेतली. अमेरिकन अध्यक्ष आज संयुक्त अरब अमिरातीला जाणार आहेत.

**पाकिस्तानी-झेंडे**

केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने पाकिस्तानी झेंडे आणि संबंधित वस्तूंच्या विक्रीबद्दल Amazon India, Flipkart, Ubuy India, Etsy, द फ्लॅग कंपनी आणि फ्लॅग कॉर्पोरेशन यांना नोटीस बजावली आहेत. अशी माहिती केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी समाजमाध्यमावर दिली आहे. अशी असंवेदनशीलता खपवून घेतली जाणार नाही. ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मना अशी सर्व सामग्री त्वरित काढून टाकण्याचे आणि राष्ट्रीय कायद्यांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. असंही त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**खेलो इंडिया**

सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेची आज सांगता होणार आहे. बिहारमधील पटनाच्या कांकरबाग इथं पाटलीपुत्र क्रिडा मैदानावर हा सोहळा पार पडेल. केंद्रिय क्रिडाराज्यमंत्री रक्षा खडसे, बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी, इतर प्रशासकीय अधिकारी, क्रिडाक्षेत्रातील इतर मान्यवर क्रिडापटू या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा महाराष्ट्र पदकतालिकेत 56 सुवर्ण आणि 45 रौप्य पदकांसह 149 पदकांसह आघाडीवर आहे. हरियाणाने काल जोरदार कामगिरी करत 35 सुवर्ण आणि 26 रौप्य पदके जिंकून एकूण 107 पदकांसह दुसरे स्थान पटकावले. राजस्थान 22 सुवर्ण पदकांसह 55 पदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे. महाराष्ट्रानं काल ॲथलेटिक्स स्पर्धेत दहा सुवर्ण पदकांसह 15 पदकं मिळवत ऐतिहासिक कामगिरी केली.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार